REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# स्त्री उद्योजिका आर्थिक विकास आणि महिला उद्योग धोरण

प्रा. डॉ. वर्षा गंगणे
एम.बी. पटेल कला–वाणिज्य–विज्ञान महाविद्यालय
देवरी, जिल्हा गोंदिया.

## प्रस्तावना



सक्षमीकरणाच्या वाटेवरून चालतांना स्त्रियांनी जवळ–जवळ सर्वच क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. आज असे एकही क्षेत्र नाही जेथे तिचा वापर नाही. प्रत्येक क्षेत्रातील तिचा वापर व सहभाग आर्थिक विकासाची एक नांदीच म्हणता येईल. कालपर्यंत पुरूषांची मक्तेदारी असणाऱ्या उद्योग क्षेत्रात देखील ती समर्थपणे उद्योगांची धुरा सांभाळतांना दिसत आहे. एकीकडे अनेक उद्योजिका आपल्या कार्याची छाप अर्थव्यवस्थेवर उमटवतांना स्पष्टपणे दिसत आहेत तर दुसरीकडे हे प्रमाण अत्यंत कमी असल्याचेही दिसून येते. भारतात स्त्रियांनी सुरू केलेल्या उद्योगांचे प्रमाण 13.8% इतके कमी आहे. तर महाराष्ट्रात ते केवळ ९% आहे. स्त्रियांनी उद्योगक्षेत्रात पाऊल टाकल्यास ती औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत महत्वाचा वाटा उचलू शकते. हा आत्मविश्वास स्त्रियांच्या ठिकाणी निर्माण व्हावा म्हणून शासनाने महिला उद्योजकासाठी २०१७ मध्ये देशात प्रोत्साहन धोरण राबविण्याची घोषणा केली आहे. उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढून तो २०% करण्याचा शासनाचा मानस आहे. असे झाल्यास औद्योगिक क्षेत्रातील स्त्रियांची भूमिका, तिचा आर्थिक दर्जा व समाजातील स्थान तसोच देशाच्या एकूण उत्पन्नातील व विकासातील वाटा स्पष्टपणे समोर येईल. स्त्रियांचा आर्थिक दर्जा उंचावण्याची सुवर्णसंधी महिला उद्योग धोरणाच्या स्वरूपात उभी आहे व त्याचा लाभ स्त्रियांनी घेतल्यास एक नवे दालन तिच्यासाठी उघडणार आहे. ज्यात तिचे कौशल्य, नेतृत्व आणि कार्यक्षमता इत्यादी गुणांना वाव मिळू शकेल. "ती सक्षम तर देश सक्षम" याची प्रचिती सहज शक्य होऊ शकेल.

कोणत्याही उद्योजकात चिकाटी, सहनशिलता, सातत्य आणि सर्वांना सामावून घेण्याची वृत्ती आणि व्यवस्थापन कौशल्य इत्यादि गुण असणे आवश्यक असते. स्त्रिया कुटुंबप्रमुख असल्यामुळे व कुटुंब चालविण्याचे कसब तिच्याजवळ असल्यामुळे स्त्रिया उद्योगांची जबाबदार समर्थपणे पार पाडू शकतात. थेडेसे धैर्य, प्रेरणा, प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ लाभल्यास ती उद्योगक्षेत्रात गगनभरारी घेऊ शकते. औद्योगिक विकासासाठी नविन प्रोत्साहन धोरणाच्या रूपाने तिला तांत्रिक व्यवस्थापकीय आणि आर्थिक सहाय्य पुरवून उद्योग आणि रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हे तिच्यासाठी उचलण्यात आलेले एक स्तुत्य पाऊल आहे व खऱ्या अर्थाने स्त्रीसक्षमीकरणाची रूजुवात आहे असे म्हणता येईल. कारण आर्थिकदृष्ट्या स्त्री सक्षम झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्रीसक्षमीकरणाचे ध्येय गाठता येणार नाही.

भारतात अजूनही स्त्रियांना दुय्यम स्थान असल्यामुळे अनेक क्षेत्रांपासून तिला वंचित ठेवले जाते. तू हे करू शकणार नाही, तुला हे झेपणार नाही. लोकं काय म्हणतील? ते तुझे काम नाही, उद्योगात खूप धाडस लागतं, ते तुला जमणार नाही. घराकडे दुर्लक्ष होईल अशी एक ना अनेक कारणे सांगून तिला त्या

वाटेपासून, विचारांपासून परावृत्त केले जाते व ती एका चांगल्या संधीपासून वंचित राहते. काळाच्या ओघात तिच्यात हळूहळू बदल होत आहेत. उद्योग जगतात पाऊल ठेवण्याचे धाडस ती करू लागली आहे. २०१४ व २०१५ या दोन्ही वर्षी दिल्ली येथे झालेल्या "इंडिया इंटरनॅशनल ट्रेड फेअर" येथे अनेक उद्योजिकांनी भाग घेतला आहे. २०१६–२०१७ या वर्षी स्टार्ट अप अँड स्टँड अप या संकल्पनेवर आधारित असणाऱ्या या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात महाराष्ट्र विभागत स्टार्ट अप अँड स्टँड अप या शासकीय योजनांची माहिती प्रदर्शित करण्यात आली. त्याचा अनेक उद्योजकांना लाभ झाला. दरवर्षी १३ ते २० नोव्हेंबर दरम्यान भारत सरकारतर्फे प्रदर्शनाची एक संकल्पना (थीम) बनवून उद्योजिकांना माहिती, मार्गदर्शन व संधी उपलब्ध करून दिली जाते. नुकतेच महाराष्ट्र शासनाने महिला उद्योग धोरण केले आहे. त्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे झाल्यास स्त्री उद्योजिकांसाठी तो एक मैलाचा दगड ठरेल त्यामुळे स्त्री उद्योजिकांच्या संख्येत वाढ होऊन एक सशक्त वारसा पुढे नेता येईल.

उद्योग आणि स्त्रिया हे समीकरण भारतासाठी नविन नाही. कारण अनेक व्यवसाय स्त्रिया सक्षमपणे करतात. आर्थिक क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनिय आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास मासे व्यवसायात स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे आहे. शेती व्यवसायात स्त्रियांची संख्या अधिक आहे. हस्तकला व अनेक स्वयंरोजगारात स्त्रियांची संख्या अधिक आहे. पण या व्यवसायांचा समावेश स्वयंरोजगार लघु आणि कुटीर व्यवसायात होतो ज्यामुळे आर्थिक उलाढालींचे प्रमाण अत्यल्प आहे. नविन महिला उद्योजिका धोरणामुळे स्त्रियांना मोठ्या उद्योगात वाव मिळू शकेल. त्यांचे स्वतंत्र व्यक्तीत्व विकसीत होऊन देशाच्या आर्थिक विकासाला मोठा हातभार लागू शकेल.

## महिला उद्योजिका धोरणातील प्रमुख तरतुदी :

राज्यात प्रथमच हे धोरण लागू करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी केली जात आहे. यातील प्रमुख तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

(१) या योजनेचा लाभ एकल मालकी, भागीदारी, सहकारी क्षेत्र, खजगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक आणि स्वयंसहायता बचतगट यांना मिळणार आहे.

(२) या योजनेतर्फे राबविण्यात येणाऱ्या उद्योगाचे ५०% महिला कामगार असणे आवश्यक आहे.

(३) या योजनेच्या लाभासाठी सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम २००७ अंतर्गत येणाऱ्या उत्पादनक्षम उद्योग आणि सामुहिक प्रोत्साहन २०१३ मधिल उपक्रम पात्र ठरू शकतात.

(४) सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत अतिरिक्त सवलती दिल्या जाणाऱ्या योजनेतील तालुका वर्गिकरणानुसार देव असलेल्या स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १५ ते ३५% दराने २० ते १०० लाखांपर्यंत भांडवली अनुदान देण्यात येणार आहे. उत्पादन सुरू झाल्यापासून ५ समान वार्षिक हप्त्यात त्याचे वाटप करण्यात येणार आहे.

(५) विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांसह कोकण विभागातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमधिल उद्योगांना प्रति युनिट विजेमार्ग इ.स. आणि इतर जिल्ह्यातील उद्योगांना प्रति युनिट मागे १ रूपया एवढी सवलत पाप वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात येणार आहे.

(६) सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना स्थावर मालमत्ता संपादन करण्यासाठी बँका व सार्वजनिक वित्तिय संस्थाकडून घेतलेल्या मुदत कर्जावर प्रत्यक्ष भरणा केलेल्या व्याजासाठी ५% पर्यंत व्याजदर अनुदान देण्यात येईल.

(७) पात्र उद्योगातील महिला कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधी किंवा राज्य कामगार कल्याण योजनेमध्ये जे कंपनीचे योगदान असेल त्या ५०% पर्यंत अनुदान ५ वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात येईल.

(८) उत्पादनाची विक्री होण्यासाठी मुद्राचिन्ह विकसीत करण्यासाठी केलेल्या ५०% व कमाल १ कोटीपर्यंत शासनाकडून सहाय्य देण्यात येईल.

(९) देशभरातील विविध प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यासाठी महिला उद्योगांना ५०,००० किंवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्याच्या ७५% रक्कम व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी ३ लाखाच्या मर्यादेत सवलत देण्यात येईल.

(१०) महिला उद्योजकांसाठी आयोजित केलेल्या प्रदर्शनासाठी खर्चाच्या ५०% रक्कम कमाल १० लाखाच्या मर्यादित सहाय्य देण्यात येईल.
(११) सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर महिला उद्योजकांसाठी महाराष्ट्रात कमाल ३ ठिकाणी इन्क्यूबेटर्स स्थापन करण्यात येतील.
(१२) माहिती व तंत्रज्ञान पुरस्कारांच्या धर्तीवर व्यवसायातील सर्वोत्कृष्ट महिला उद्योजिकांना वेगळा स्वतंत्र पुरस्कार देण्यात येईल.
(१३) महिला व बालकल्याण विभागाकडून महिला उद्योजिकांसाठी ५० कोटी रू. चा विशेष साहसनिधी तयार करण्यात येईल.
(१४) प्रत्येक महिला कामगाराला उत्पादन सुरू झाल्यानंतर सुरूवातीची तीन वर्षे प्रशिक्षणासाठी दरवर्षी ३००० रू. ची मदत प्रमोद महाजन कौशल विकास योजनेशी जोडण्यात येणार आहे.

या धोरणामुळे राज्यातील महिला उद्योगांचे प्रमाण ९% वरून २०% पर्यंत वाढविणे शक्य होईल. आगामी ५ वषात १५ ते २० हजार महिला उद्योगिकांतर्फे दोन हजार कोटी रू. मुल्याची गुंतवणूक व एक लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. बचतगटातील महिलांना शासनतर्फे बीनव्याजी कर्जाची सोय उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे स्त्रियांच्या आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणाात हातभार लागणार आहे.

## महिला उद्योजिका धोरणातील अडचणी :

**(१) माहिती व मार्गदर्शनाचा अभाव —** उद्योगप परिषदेत महिला उद्योग धोरण जाहिर झााले त्यात दिडशे देशातील प्रतिनिधी मंडळांनी सहभाग घेतला ज्यात स्त्रियांचा समावेश होता. अफगाणिस्थान, सौदी अरेबिया आणि इस्राईलसारख्या दहा देशातून केवळ महिला प्रतिनिधी सहभागी झाल्या. आम्ही उद्योगांनी, मैत्री यासारख्या महाराष्ट्रातील संस्थांनीही यात भाग घेतला. पण एकूण स्त्रियांमध्ये हे प्रमाण अत्यल्प आहे. कारण बहुसंख्य स्त्रियांपर्यंत ही माहिती ठराविक वेळेत पोहचत नाही. परिषदेतील सहभाग व त्यातील मुद्द्यांबाबत मार्गदर्शन त्यांना न मिळाल्यामुळे धोरणाच्या रूपरेषेपासून त्या अनभिज्ञ राहतात. तळागाळातील स्त्रियांना तर याचा मागणूसही लागत नाही.

**(२) स्त्री उद्योजिका संघटनाचा अभाव —** भाारतात लहान—लहान व्यवसाय करणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत. अगदी कुटुंबाचा भार एकटी उचलणाचा अनेक स्त्राी उद्योजिका आहेत. पण त्यांच्यात संघटितपणा नसल्यामुळे त्या एकमेकींच्या कार्याशी परिचित नाहीत. स्त्री उद्योजिकांच्या संघटना अत्यंत कमी असल्यामुळे परिषदांचे आमंत्रण ते कार्यकारिणी आणि नविन धोरणाची अंमलबजावणी यापासून त्या बऱ्याच दूर असतात. त्यामुळे स्त्राी उद्योजिका धोरण जरी त्यांच्यासाठी लागू झाले तरी ते अंमलात आणण्यास बराच विलंब होतो. संघटना नसल्यामुळे त्यांचे अस्तित्व व आवाज दबका होतो. उदरनिर्वाहापुरता व्यवसाय ही संकल्पना असल्यामुळे त्या उद्योगक्षेत्राात मोठी भरारी घेऊ शकत नाहीत.

**(३) संगणक पोर्टल पासून दूर —** व्यवसाय करणाऱ्या सगळ्याच स्त्रियांना संगणकाचे ज्ञान नाही. शासनाने सुरू केलेल्या मैत्राी या पोर्टलला ते नि:शुल्क असूनही स्त्रियांचा फारसा प्रतिसाद नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांना ऑनलाईन माहिती उपलब्ध आहे. तरीही उद्योजिकांनी आपली नोंदणी केलेली दिसत नाही. (FSSAI) खद्यपदार्थ संबंधित उद्योगांसाठी आवश्यक परवाना शॉप, ॲक्ट लायसन्स हे सर्व ऑनलाईन माहितीतून घेता येते पण अनेक स्त्रिया अजूनही एजंटच्या शोधात असल्याचे दिसून येते. त्यामुळे अद्ययावत ज्ञानापासून त्या वंचित राहतात.

**(४) आत्मविश्वास आणि प्रेरणेचा अभाव —** स्त्रियांमध्ये मी उद्योग सक्षमपणे करू शकेल कां? याबाबत मुळातच आत्मविश्वासाचा अभाव आहे. तिच्या अंगी कितीही सामर्थ्य व गुण असले तरी सामाजिक चौकट व संस्कार यामुळे तिच्यात आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. परिणामी औद्योगिक क्षेत्रात पाऊल टाकण्यास ती घाबरते. काही स्त्रिया धाडस करतात पण उद्योग क्षेत्रात मोठी झेप घेण्याचे टाळतात.

स्त्रियांना उद्योगासाठी कुटुंब व समाजातून प्रेरणा मिळत नसल्यामुळे त्या पुढे येण्यास सहसा तयार होत नाहीत. उद्योग म्हणजे पुरूषांची मक्तेदारी ही संकल्पना पिढ्या न पिढ्या मनात रूजली असल्यामुळे स्त्रिया बऱ्याच मागे राहिल्याचे दिसून येते.

**(५) उद्योगातील सातत्याचा अभाव —** उद्योगातील सातत्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उद्योगातील चढ—उतारोचा सामना करीत त्यात टिकून राहणे महत्त्वाचे असते. उद्योगाचे धोरण व्यवस्थितपणे समजून घेतले तर त्यातील बारकावे, संकटे, उपाययोजना, मदतीची स्थाने इत्यादींची माहिती मिळविता येते. औद्योगिक वारसा असलेल्या स्त्री उद्योजिका उद्योगातील सातत्य आणि उद्योग जगताशी परिचित असतात. पण काही स्त्रिया हंगामी व्यवसाय केल्याप्रमाणे थोड्या संकटाने खचून जाणाऱ्या असतात. उद्योगात सातत्य ठेवण्यासाठी स्त्री उद्योजिकांचा वारसा चालविणे आज गरजेचे आहे.

**(६) संकुचित मानसिकता —** महिला उद्योग धोरणाची माहिती सकरात्मक पध्दतीने तळागाळातील स्त्रियांपर्यंत पोहचणे गरजेचे असते. राज्यात अनेक बचतगट, लघुउद्योजक कार्यरत आहेत पण ग्रामीण व शहरी भगातील अनेक स्त्रियांना साध्या साध्या परवान्यांची (लायसेंस) माहिती नतसे. उद्योजिका तर खूप आहेत पण आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करता आले नाही अशी अवस्था अनेक स्त्रियांची आहे. संकुचित मानसिकता घेऊन उद्योगक्षेत्रात काम करतांना तिला अनेक लहान लहान अनपेक्षित समस्यांचा सामना करावा लागतो. ज्यामुळे ती वारंवार खचते.

**(७) विपणन व्यवस्थेची माहिती नसणे —** अनेक उद्योजिकांना आपल्या मालाची विक्री नेमकी कुठे आणि कशी करावी याबाबत माहिती नसते त्यामुळे त्यांच्या मालाला योग्यवेळी योग्य ती किंमत मिळत नाही. जिल्हा उद्योग केंद्रातून पुरेशी माहिती मिळविली जात नाही. अनेक कर्मचारी व अधिकारी ती योग्य पध्दतीने सांगत नाहीत. अनेकदा लाच मागितली जाते त्यामुळे बाजारव्यवस्थेचे तिचे स्थान अपुरे ठरते.

आज अनेक ठिकाणी अगदी परदेशात देखील आपल्या उत्पादनाला ग्राहकवर्ग मिळावा म्हणून NSIC तर्फे परदेशातील प्रदर्शनासाठी मदत दिली जाते. विदेशातील “एमएलएमई” आणि “एनएसआयसी” तर्फे विविध योजना उपलब्ध आहेत. त्यांच्याद्वारे अनेक स्त्रिया आपला उद्योग वृध्दींगत करू शकतात. सुषमा कानिटकर पेनिसिलव्हानिया येथे बी.टू.बी. (बिझनेस टू बिझनेस) अंतर्गत आपले उत्पादन विकण्यासाठी कोणत्या आवश्यक गोष्टींची पूर्तता करावी लागते. याबाबत कार्यशाळा आयोजित करतात. पण ही योजना स्त्रियांपर्यंत पोहचविण्यासाठी खूप पेपरवर्क करावे लागते, सातत्य ठेवावे लागते असे त्यांनी सांगितले.

**(८) भांडवलाचा अभाव —** उद्योग जगतात पुढे सरसावण्यासाठी अनेक महिला उद्योजिका तयार असतात पण मोठ्या भांडवलाची कमतरता तसोच कर्ज घेतांना तारण संपतत्तीचा अभाव यामुळे वित्तीय तरतूद कशी करायची हा मुख्य प्रश्न निर्माण होतो. मर्यादित आर्थिक स्रोत व गुंतवणूक सहाय्याचा अभाव यामुळे उद्योजिकांसमोर भांडवलाचा अभाव ही मोठी समस्या निर्माण होते. नविन महिला धोरणात कर्जसोयीची तरतूद करण्यात आलीअ सली तरी कर्जाची प्रक्रिया किचकट असल्यामुळे तसेच कर्ज मिळण्यास विलंब होत असल्यामुळे उद्योजिकांसमोर एक मोठी समस्या निर्माण होते.

वरील मुख्य समस्यांशिवाय सुरक्षित व परवडण्यायोग्य जागी, बाजारातील स्पर्धा, तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव व्यवस्थेतील अडथळे, वीजपुरवठा यासारख्या अनेक समस्यांना सामना करावा लागतो. परिणामी महिला उद्योजिका धोरणचा अवलंब करतांना वरील अडचणी विचारात घ्याव्या लागतात. पण या अडचणींवर मात करून योग्य उपाययोजना केल्यास साध्याचे महिला उद्योजिकांसाठी असलेले धोरण स्त्रियांच्या प्रगतीसाठी एक आशावादी पाऊल होय असे म्हणता येईल.

## निष्कर्ष :

(१) देशाच्या शाश्वत आर्थिक विकास महिला उद्योजिकांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

(२) महिला उद्योजक धोरणामुळे स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील.

(३) महिला उद्योजिका धोरण सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले एक भरीव पुढचे पाऊल आहे.

(४) महिला उद्योजिका धोरण स्त्रियांची स्वतंत्र ओळख निर्माण करून देणारे आहे व त्यांचे प्रमाण वाढविणारे आहे.

(५) या धोरणामुळे देशाच्या आर्थिक विकासास मदत मिळेल.
(६) या धोरणात उद्योजिकांसाठी अनेक नवीन तरतूदी केल्या आहेत.
(७) स्त्रियांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी हे धोरण उपयुक्त आहे.
(८) आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी महिलांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे.
(९) अनेक उद्योजिका कर्जाची परतफेड वेळेवर करीत नाहीत त्यामुळे नविन कर्ज मिळण्यात अडचण निर्माण होते.
(१०) ग्रामिण क्षेत्रात उद्योग सुरू केल्यास शहरीकरण व स्थलांतरणाला पायबंद लावता येईल.
(११) स्त्री उद्योजिकतेचा सशक्त वारसा चालविण्यासाठी हे धोरण उपयुक्त आहे.

## शिफारसी :

महिला उद्योजिकांसाठी प्रोत्साहन धोरण त्वरित अंमलात आणले गेल्यास देशाच्या आर्थिक विकासात एक क्रांतीकारक बदल घडवून आणता येईल. त्यातील तरतूदी व अडचणी लक्षात घेता काही शिफारसींचा विचार करणे गरजेचे आहे.
(१) स्त्रियांमध्ये उद्योगक्षेत्राविषयी जागरूकता निर्माण केली जावी.
(२) स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला जावा.
(३) उद्योगांनी संघटनांची स्थापना केली जावी.
(४) कर्ज मिळविण्याची पध्दत सुलभ केली जावी.
(५) स्त्रियांना माहिती व मार्गदर्शनाची माध्यमे यांची माहिती पुरविण्यात यावी.
(६) शासनाने धोरण पारदर्शक दृष्टीकोनातून व काटेकोरपणे अंमलात आणावे.
(७) स्थानिक तसेच ग्रामीण क्षेत्रात उद्योग स्थापित करावे. त्यामुळे आर्थिक व सामाजिक विषमता दूर करता येईल.
(८) कौशल्य विकास योजना व प्रशिक्षण सोयी स्थानिक तसोच जिल्हा/तालुका पातळीवर उपलब्ध करून देण्यात याव्या.
(९) अधिकाऱ्यांनी उद्योजिकांना माहिती पुरवावी तसेच स्त्रियांनी उद्योगांबाबत उत्साह व रूची दाखवावी.
(१०) विपणन, जाहिराती व बाजाराविषयी माहिती पुरविण्यात यावी.

वरील सर्व शिफारसींचा गांभियर्याने विचार केल्यास महिला उद्योग धोरण यशस्वी ठरेल असे म्हणता येईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या शब्दात – “विकासात महिलांची भूमिका महत्वाची आहे. कृषीक्षेत्रात महिलांचा वाटा ५० टक्के आहे. आज विज्ञानक्षेत्रातही भारतीय महिलांचे योगदान मोठा आहे. गुजरातमधिल दुध व्यवसाय व लिज्जत ब्रांड महिलांमुळेच अस्तित्वात आहेत.”

डोनाल्ड ट्रम्प यांच्या सल्लागार इव्हान्का ट्रम्प यांच्या शब्दात – “उदयमशीलतेमधील लिंगभेद दूर करावा”.

हैदराबाद इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर येथे जगभरातील विविध देशांची शिष्टमंडळे, नवउद्योजक, गुंतवणूकदार, शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत इत्यादी या संम्मेलनात सहभागी झाले होते. मेक इन इंडियासाठी महिला उद्योजक धोरण अतिशय उपयुक्त व फलदायक ठरेल याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही.

## उद्योगीतींसाठी माहिती :

- एमएसएमई डाटा बँक रजिस्ट्रेशन www.msmedatabank.in
- उद्योग आधार रजिस्ट्रेशन Udyogdhar.gov.in
- शॉप ॲक्ट म्युनिसिपल कार्पोरेशन लायसन्स www.mcgm.gov.in
- मैत्री https://maitri.mahaonline.gov.in

**संदर्भसूची :**


- आम्ही उद्योजिका – नोव्हें. २०१७
- उद्योजक – डिसें. २०१७
- दै. सकाळ वृत्तपत्र – २९ नोव्हें. २०१७
- महिला उद्योजिका धोरण अहवाल – जानेवारी २०१८


**महाराष्ट्र शासन**


- योजना – डिसेंबर २०१७
- कुरूक्षेत्र – डिसेंबर २०१७